पुढारी


# विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक, कर्मचाऱ्यांना 'वर्क फॉर्म होम'

## शैक्षणिक अधिविभाग, प्रशासकीय विभाग बंद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक व तातडीची उपाययोजना म्हणून शिवाजी विद्यापीठातील सर्व शैक्षणिक अधिविभाग, प्रशासकीय विभाग १४ एप्रिलपर्यंत बंद राहतील. याकालावधीत अधिविभागप्रमुख, प्रशासकीय अधिकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची घरी राहून आवश्यक ते सर्व कामकाज करावे, असे परिपत्रक कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी काढले आहे.

राज्य सरकारने कोरोना विषाणूचा संसर्ग होऊ नये व प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेच्या दृष्टीने आदेश काढले आहे. त्यानुसार विद्यापीठ अधिविभाग व प्रशासकीय कामकाज पुढील आदेश होईपर्यंत बंद ठेवण्यात येणार




आहे. कार्यालयीन कामकाजासाठी शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांची गरज भासल्यास कार्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

अत्यावश्यक सेवेतील विभागांनी विद्यापीठातील सेवा सुरळीत ठेवण्याबाबत योग्य ते नियोजन करावे, असे कुलसचिवांनी काढलेल्या परिपत्रकात म्हटले आहे.

सकाळ

# विद्यापीठात आता वर्क फ्रॉम होम

## कुलसचिव डॉ. नांदवडेकर; सोशल मीडियावरून केले आवाहन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातून व्हॉट्सॲप व मोबाइलद्वारे कर्मचाऱ्यांना आरोग्याबाबत सल्ले देण्यात येत आहेत. वर्क फ्रॉम होम करण्याचे कर्मचाऱ्यांना आदेश दिला आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.



शासनाच्या निर्देशानुसार पाच टक्के कर्मचाऱ्यांना कामावर हजर राहण्याचा आदेश दिला आहे. त्याची अंमलबजावणी सुरू झाली असून, कर्मचाऱ्यांना वर्क फ्रॉम होमची सूचना केली आहे. त्याचबरोबर विद्यापीठातील आरोग्य केंद्राद्वारे कर्मचाऱ्यांना आजाराबाबत व्हॉट्सॲप व मोबाईलद्वारे ०२३१ - २६०९२८० क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे. सकाळी नऊ ते दुपारी एकपर्यंत ही सुविधा उपलब्ध केली आहे.

विद्यापीठातील वसतिगृह, मेस, कँटीन्सची स्वच्छता केली जात आहे. औषध फवारणी करून निर्जंतुकीकरणाचे काम केले जात आहे. कर्मचाऱ्यांसाठी मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वारावर सैनिक उपलब्ध केले आहेत. विद्यापीठात भेटायला येणाऱ्यांना ई-मोडद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन केले असल्याने त्यांना प्रवेशद्वारावरच सुरक्षारक्षकांतर्फे तशी माहिती देण्यात येत आहे.

पुढारी

# उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित

## शिवाजी विद्यापीठातून...

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२० मध्ये घेण्यात येणाऱ्या उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित करण्यात आल्या आहेत.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी देशभर १४ एप्रिलपर्यंत संचारबंदी, जमावबंदी (लॉकडाऊन) लागू करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक, प्रात्यक्षिक, लेखी परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठातील सर्व अधिविभाग, संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य यांना २७ मार्च रोजी काढण्यात आले आहे.

**स्वतंत्र वेळापत्रक लवकरच**

स्थगित परीक्षेच्या फेरनियोजनाबाबतचा तपशील व स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येईल, असे विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांनी सांगितले.

# थोडक्यात

## विद्यापीठाच्या परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित

कोल्हापूर : करोना विषाणू संसर्गाचा पार्श्वभूमीवर राज्य सरकारने दिलेल्या आदेशानुसार ३१ मार्चपर्यंत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या. मात्र, आता केंद्र सरकारने संचारबंदी लागू केली असल्यामुळे १४ एप्रिलपर्यंत विद्यापीठासह महाविद्यालयीन परीक्षाही स्थगित करण्यात आल्याची माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी परिपत्रकाद्वारे दिली. करोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी देशभर लॉकडाउन केल्यामुळे विद्यापीठाच्या उन्हाळी सत्र परीक्षांचे नियोजन १४ एप्रिलनंतर करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या परीक्षा विभागाच्यावतीने विविध अभ्यासक्रमाच्या सुमारे ६८० परीक्षा घेण्यात येतात.

# परीक्षा १४ एप्रिलपर्यंत स्थगित

कोल्हापूर : कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून मार्च व एप्रिलच्या पहिल्या आठवडयातील उन्हाळी सत्रातील सर्व परीक्षा दि. १४ एप्रिलपर्यंत स्थगित करण्यात आली आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्र. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे गजानन पळसे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, शिवाजी विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व मौखिक/ प्रात्यक्षिक/लेखी परीक्षा दि. १४ एप्रिल २०२० पर्यंत स्थगित करण्यात येत आहेत. तसेच स्थगित परीक्षेच्या फेरनियोजनाबाबतचा तपशील व स्वतंत्र वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर जाहीर करणेत येईल.